## ३ .१९९१ नंतरच्या महत्त्वाच्या संकल्पना आणि समस्या : मानवतावादी प्रश्न

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**
**(१) रिओ दी जानेरिओ अर्थ समिट (१९९२) यावर लक्ष केंद्रित करतो.**

**(अ) पर्यावरण आणि विकास**
(ब) आण्विक प्रसारबंदी
(क) आंतरराष्ट्रीय व्यापार
(ड) लिंगभाव निगडित समस्या

**(२) आज भारताचा लिंगभाव निगडित दृष्टिकोन यावर लक्ष केंद्रित करतो.**
(अ) शिक्षण
(ब) लोककल्याण
(क) विकास
**(ड) सक्षमीकरण**

**(ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

**(१) जास्त उत्पन्न देणाऱ्या जातीच्या बियाणांचा विकास सिंचन पद्धतीचा विस्तार -**
**उत्तरे:** हरित क्रांती

**(२) भारतीय सरकारचा विचारगट म्हणून काम करणे व सरकारला निर्देशक आणि धोरणात्मक सल्ले देते-**
**उत्तरे:** नीति आयोग

**प्र.२ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

**(१) नियोजन आयोगाची निर्मिती कृषी विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी झाली.**
**उत्तर:** वरील विधान चूक आहे.
**कारण:** लोकांचे राहणीमान उंचावणे आणि देशाचा आर्थिक विकास करणे या उद्देशाने मार्च १९५० मध्ये नियोजन आयोगाची निर्मिती झाली.

**(२) राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना महिला हक्क संरक्षणासाठी करण्यात आली.**
**उत्तर:** वरील विधान बरोबर आहे.
**कारण:** महिलांच्या हक्कांचे व कायदेशीर बाबी संरक्षण करण्याची ग्वाही राष्ट्रीय महिला आयोगाच्या स्थापनेच्या वेळी देण्यात आली.

**प्र.३सहसंबंध स्पष्ट करा:**

**(१) महिला सक्षमीकरण आणि शाश्वत विकास.**
**उत्तर:** (१) महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांचा आत्मविश्वास जागृत करून त्यांच्यात त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याची क्षमता निर्माण करणे.
(२) महिला सक्षमीकरणाच्या अंतर्गत त्यांना शिक्षणाची व रोजगाराची समान संधी उपलब्ध करून दिली जाते.
(३) उदयमशील महिला एकत्र येतात आणि स्वयंसाहाय्यता गटाच्या माध्यमातून स्वत:चा व समाजाचा शाश्वत-कायम स्वरूपी विकास घडवून आणतात.

**(२) गरिबी आणि विकास.**
**उत्तर:** (१) गरिबी म्हणजे मिळकतीचा आणि उत्पादन साधनांचा अभाव, गरिबीमुळे शिक्षणाचा अभाव असतो. त्यातून मागासलेपणा उद्भवतो.
(२) दारिद्य निर्मूलन कार्यक्रमाचे उद्दिष्ट अशा दुर्लक्षित घटकांना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हे आहे. त्याद्वारा त्यांचे दारिद्य दूर होऊन त्यांच्या विकासाचा मार्ग खुला होईल.
(३) देशाच्या आर्थिक विकासासाठी दारिद्य निर्मूलनाला प्राथमिकता दिली जाते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतातील दारिद्रय निर्मूलनाद्वारा आर्थिक विकासाच्या उद्दिष्टांचा पाठपुरावा केला आहे. त्यामुळे भारतातील दारिद्याचे प्रमाण उत्तरोत्तर कमी होत गेले आणि भारताने आर्थिक विकासात मोठा पल्ला गाठला आहे.

**प्र. ४ आपले मत नोंदवा.**

**(१) पर्यावरण संरक्षण ही काळाजी गरज आहे.**
**उत्तर:** पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज आहे, या विधानाशी मी सहमत आहे.
**कारणे:** (१) पर्यावरण संरक्षण करणे माणजे नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे. त्यासाठी पर्यावरणाची होणारी हानी रोखली पाहिजे.
(२) उपलब्ध असलेली ऊर्जेची साधने मर्यादित आहेत. त्यांचा बेसुमार वापर केल्यास ती संपुष्टात येतील. म्हणून ऊर्जेचे पर्यायी स्रोत विकसित करणे गरजेचे आहे.
(३) पर्यावरण संवर्धन करण्यात आल्यास आजच्या पिढीच्या गरजा पूर्ण करून पुढील पिढींच्या गरजा भागवण्याची क्षमता टिकून राहील.
(४) पर्यावरण संरक्षणाकडे दुर्लक्ष केल्यास प्रदूषण, पाण्याची कमतरता आणि जैविक विविधतेचा ्हास उद्भवेल.

**प्र.५ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**(१) हरित क्रांती म्हणजे काय?**
**उत्तर:** (१) हरित क्रांती म्हणजे जास्त उत्पन्न देणाऱ्या जातींच्या बियाणांचा विकास, कृत्रिम खतांचे व कीटकनाशकांचे वितरण तसेच सिंचनाच्या पद्धतीचा विस्तार.
(२) तिचे उद्दिष्ट कृषी उत्पादनात वाढ करून भारताला अन्नधान्यात स्वयंपूर्ण करणे असे होते.
(३) स्वातंत्राप्तीच्या वेळी भारत कृषीप्रधान देश असूनही देशाची अन्नधान्याची गरज भागवण्यासाठी परदेशातून अन्नधान्याची आयात करावी लागत असे.
(४) या समस्येचे निराकरण करण्यासाठी भारत सरकारने शेतीच्या विकासावर लक्ष केंद्रित केले. कृषी-संशोधनास उत्तेजन दिले.
(५) या धोरणाचा दृश्य परिणाम म्हणजे १९६० च्या दशकात भारतात अन्नधान्याचे उत्पादन सातत्याने वाढत जाऊन देश अन्नधान्याच्या गरजेबाबत स्वयंपूर्ण बनला. या घटनेचे वर्णन हरितक्रांती (Green Revolution) असे करण्यात येते.

**(२) महिला सक्षमीकरण म्हणजे काय ते सांगून त्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना सांगा.**
**उत्तर: (अ) महिला सक्षमीकरण:** सक्षमीकरण म्हणजे अशी प्रक्रिया ज्याद्वारे शोषित व्यक्तींना स्वत:च्या आयुष्यावर ताबा मिळवता येतो, यामुळे जगण्याच्या मूलभूत गरजा त्यांना भागवता येतात. या प्रक्रियेत व्यक्तीस ताकद व आत्मविश्वास प्राप्त होतो, तिचा स्वाभिमान वाढतो आणि अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी बळ निर्माण होते. अशा प्रकारे पारंपरिक अर्थाने दुर्बल समजल्या जाण्याच्या महिलांमध्ये आत्मविश्वास वृद्धिंगत करून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याच्या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात.
**(ब) उपाययोजना:** महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुढील उपाययोजना करण्यात आल्या आहेत:
**(१) संवैधानिक तरतुदी:** भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिका, मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे यांत महिलांच्या सक्षमोकरणासाठी विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. समानतेचा हक्क सर्वांत महत्त्वाचा आहे. महिलांच्या कल्याणासाठी/सक्षमीकरणासाठी विशेष कायदे करण्याचा अधिकार संसदेस आहे. समान कामासाठी

समान वेतन हे मार्गदर्शक तत्त्व महत्त्वाचे आहे.
**(२) वैधानिक तरतुदी:** महिलांवर होणाऱ्या अन्यायाचे निवारण करण्यासाठी हुंडा प्रतिबंधक कायदा सारखे अनेक कायदे करण्यात आले आहेत. अलीकडच्या काळात राष्ट्रीय महिला आयोग, महिलांचे सक्षमीकरणविषयक राष्ट्रीय धोरण, ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्त्यांद्वारा स्थानिक शासनात ३३% जागा व अधिकारपदे महिलांसाठी आरक्षित करण्यात आली आहेत.
**(३) स्वयंसाहाय्यता गटांच्या स्थापनेस प्रोत्साहन:** आथिंक दृष्ट्या कमकुवत असलेल्या महिलांनी एकत्र यावे आणि स्वयंसाहाय्यता गटांची स्थापना करून आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावे या कृती कार्यक्रमाला प्रोत्साहन देण्यात आले आहे. अशा उपक्रमांसाठी शासन व वित्तसंस्था अनुदान देतात. सवलतीच्या दराने वित्तपुरवठा करतात आणि त्यांच्या द्वारा उत्पादित वस्तूंच्या विपणनास साहाय्य करतात.

**प्र.६ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

**भारतातील महिलांची स्थिती**
**(अ) आर्थिक असमानता**
**(ब) तस्करी व शोषण**
**(क) साक्षरतेचे प्रमाण**
**(ड) राजकीय प्रतिनिधित्व**

**उत्तर:** भारतातील महिलांच्या स्थितीचे विवरण पुढीलप्रमाणे:

**(अ) आर्थिक असमानता:** भारतातील सगळ्यात मोठ्या समस्यांपैकी एक म्हणजे स्त्री-पुरुषांमधील वेतनातील दरी. त्याचबरोबर श्रमिकांच्या बाजारपेठेतील महिलांची टक्केवारी २८.२% इतकी कमी आहे. तर तुलनेने पुरुष ७८.८% आहेत.
**(ब) तस्करी आणि शोषण:** २०१३ साली संयुक्त राष्ट्र मादक पदार्थ आणि गुन्हे विभागाने सादर केलेल्या अहवालात भारतातील महिलांचे जबरदस्तीने विवाह करण्यासाठी तस्करी केली जात असल्याचे म्हटले आहे. यात पुढे असे नमूद केले आहे की, 'त्यांचे बहुतेक वेळा शोषण केले जाते, त्यांचे मूलभूत हक्क डावलले जातात, त्यांना मोलकरीण म्हणून राबवून घेण्यात येते आणि कालांतराने परित्यक्त केले जाते.
**(क) साक्षरतेचे प्रमाण:** भारतातील महिलांचे साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. २०११ च्या जनगणनेच्या अहवालानुसार पुरुषांमधील साक्षरतेचे प्रमाण ८२.१४% आहे, तर महिलांमधील प्रमाण ६५.४६% आहे.
**(ड) राजकीय प्रतिनिधित्व:** भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून संसदेत आणि राज्यांतील विधानमंडळांमध्ये महिलांचे असलेले अत्यल्प प्रमाण ही समस्या राहिलेली आहे.